मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडकरांची पाण्यासाठी प्रतीक्षा कायम!

## भामा-आसखेड योजनेला नवा मुहूर्त; दिवसाआड पाणीपुरवठा कधी थांबणार?

**पिंपरी | प्रतिनिधी**

भामा आसखेड पाणी योजनेच्या भूमिगत जलवाहिनीचे रखडलेले उर्वरित ३० टक्के काम करण्यासाठी दोन ठेकेदारांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यासाठी ८५ कोटी ५९ लाख रुपये खर्च येणार असून काम पूर्ण करण्यास दहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर शहराला अतिरिक्त १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे. हे पाणी उपलब्ध होण्यासाठी आणखी वर्षभर प्रतीक्षा करावी लागणार आहे. वाढीव पाणी उपलब्ध होईपर्यंत एक दिवसाआडच पाणीपुरवठा कायम राहणार आहे.

खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणातून शहरासाठी १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी बंदिस्त जलवाहिनीद्वारे चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणण्यात येणार आहे. चारवेळा मुदतवाढ आणि सूचना देऊनही संबंधित ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही. हा प्रकल्प नोव्हेंबर २०२४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, मुदतवाढ संपूनही अद्याप ३० टक्के काम शिल्लक आहे. त्यामुळे ठेकेदाराला बडतर्फ करण्यात आले. त्यानंतर रखडलेल्या कामासाठी दहा एप्रिलला निविदा प्रसिद्ध करण्यात आली.

भामा आसखेड धरणापासून नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टाकीपर्यंत १७०० मिलीमीटर व्यासाची भूमिगत जलवाहिनी टाकण्याचे उर्वरित काम करण्यासाठी ३३ कोटी ३५ लाख रुपये खर्चाची निविदा होती. त्यासाठी पाच ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी तीन ठेकेदारांच्या निविदा पात्र ठरल्या. त्यातील ०.१ टक्के कमी दराची एका ठेकेदाराची निविदा स्वीकृत करण्यात आली. ते काम ३३ कोटी ३५ लाख ५४ हजार ८७७ रुपये दराने केले जाणार आहे. या कामाची मुदत नऊ महिने आहे.




### भामा आसखेड प्रकल्पाला नवी गती

**» भामा आसखेड पाणी योजनेच्या रखडलेल्या जलवाहिनी प्रकल्पासाठी महापालिकेने दोन नवीन ठेकेदारांची नियुक्ती केली आहे. या कामांसाठी ८५ कोटी ५९ लाख रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला असून नऊ ते दहा महिन्यांत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहराला अतिरिक्त १६७ एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यातील वाढती पाण्याची गरज भागविण्यास मदत होणार आहे. रखडलेल्या कामांमुळे विलंब झालेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आता वेगाने पूर्ण करण्यावर महापालिका प्रशासनाचा भर आहे.**

---

# टाळगाव चिखलीतील टाऊन हॉलला 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज' यांचे नाव..!

## पिंपरी-चिंचवड महापालिका महासभेत उपसूचनेस मंजुरी; नगरसेवक कुंदन गायकवाड सूचक, निखिल बोऱ्हाडे अनुमोदक

**पिंपरी | प्रतिनिधी**

टाळगाव चिखली येथील टाऊन हॉलला "जगद्गुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" असे नामकरण करण्याच्या उपसूचनेस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे वारकरी संप्रदायाच्या सांस्कृतिक वारशाला सन्मान मिळाल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. महापौर रवि लांडगे यांनी या उपसूचनेला मंजुरी दिली आहे

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल उभारण्यात आला आहे. टाळगाव चिखली हे गाव संत परंपरेशी निगडित असून, या परिसरास जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीतील समता, मानवता आणि भक्तीभावाचा प्रभाव आजही परिसरातील सामाजिक व धार्मिक वातावरणात दिसून येतो.

संत तुकोबांनी या गावात टाळ ठेवले होते. त्यामुळेच या गावाला "टाळगाव चिखली" हे नाव पडल्याची स्थानिकांमध्ये श्रद्धा आहे. या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर टाऊन हॉलला संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली होती.

महासभेत मंजूर झालेल्या या उपसूचनेनुसार, टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल आता "जगद्गुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" या नावाने ओळखला जाणार आहे. स्थानिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. ही उपसूचना भाजपा नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी मांडली होती, तर नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी अनुमोदन दिले होते.



> **"टाळगाव चिखली ही संत परंपरेची भूमी आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा वारसा आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी, या भावनेतून टाऊन हॉलला त्यांचे नाव देण्याची उपसूचना मांडली होती. महासभेने या प्रस्तावास मंजुरी दिल्याने गावाच्या सांस्कृतिक ओळखीला नवा सन्मान मिळाला आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा टाऊन हॉल उभारण्यात आला. त्याला स्थानिक लोकप्रतिनिधींची साथ मिळाली. आता तुकोबांच्या नावाने हे संकुल ओळखले जाईल, याचा मनोमन आनंद आहे."**
>
> **- कुंदन गायकवाड, नगरसेवक, भाजपा.**

# रमामंगल फाउंडेशन आयोजित मोफत शासकीय योजनांच्या शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद..

## शिवसेनेचे जिल्हा संघटक संतोषभाऊ सौंदणकर यांचा वाढदिवसानिमित्त विधायक उपक्रम..

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली रमामंगल फाउंडेशनच्या वतीने शुक्रवार (दि. १५) रोजी चिंचवड येथील रस्टन कॉलनीतील गुरुकृपा हौ. सोसायटी येथील जनसंपर्क कार्यालयात नागरिकांसाठी विविध शासकीय योजनांशी संबंधित मोफत सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. यास नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.






शिवसेना पुणे जिल्हा संघटक तथा रमामंगल फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष संतोषभाऊ सौंदणकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयुष्मान कार्ड, ABHA कार्ड, एसटी बसचे NCMC कार्ड तसेच प्रधानमंत्री वय वंदना कार्ड, विशेष संक्षिप्त मतदार पुनर्निरीक्षण कार्यक्रम यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मोठ्या संख्येत लाभार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमास खा. श्रीरंग बारणे, शिवसेना उपनेत्या तथा नगरसेविका सुलभाताई उबाळे, रामभाऊ उबाळे, नितीन बोंडे, महेश शर्मा, विक्रम तांबे, स्वप्नील गाडे, ओमप्रसाद परदेशी, उमेश परदेशी, सागर चव्हाण, गणेश गाडे, सुमित कांबळे, सुरज भराटे, संतोष मोरजकर, गणेश उगले, अश्विन मायनाळे, रजनीकांत कदम, भाऊसाहेब तांबे, अशोक कुराडे, सचिन मुंडे, सत्यजित शिंदे, महादेव शारवाले, विशाल भरटे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिवसैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संतोषभाऊ सौंदणकर म्हणाले,“८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण” या भूमिकेतून समाजासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार करत वाढदिवसानिमित्त रमामंगल फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांसाठी आरोग्य, जनजागृती आणि विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यापुढे देखील रमामंगल फाउंडेशनच्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवून पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविणार असल्याचे सांगत परिसरातील जेष्ठ नागरिकांसाठी बसण्याकरिता कट्टा आणि संरक्षक शेड उभारण्याचा संकल्प यावेळी त्यांनी केला.

# क्रीडाप्रेमी दिघीकरांचा उन्हाळी क्रीडा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचा उपक्रम, सर्वांच्या सहकार्याने शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

येथील युवक व बालकांमध्ये व्यायाम, शिस्त आणि क्रीडाप्रेमाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने ५ मे ते १५ मे दरम्यान उन्हाळी शारीरिक तंदुरुस्ती व कौशल्य विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नगरसेवक उदय गायकवाड आणि क्रीडा जिल्हाधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या संकल्पनेतून हे शिबिर राबवण्यात आले. या शिबिराला स्थानिक पालक व खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपल्या मुलांमध्ये व्यायामाची सवय, शिस्त आणि क्रीडांगणाची ओढ निर्माण व्हावी या सकारात्मक भावनेतून पालकांनी मुलांना मोठ्या संख्येने शिबिरात सहभागी करून घेतले.







गेले ११ दिवसांत हे शिबिर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात, शिस्तबद्ध नियोजनातून आणि सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडले.

हे संपूर्ण शिबिर अनिल घुले यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टरीत्या पार पडले. सर्व प्रशिक्षकांनी सहभागी खेळाडूंना शारीरिक तंदुरुस्ती, कौशल्य विकास आणि संघ भावना याचे मोलाचे प्रशिक्षण दिले. या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून मोहन झुंजे पाटील, गणेश झगडे, विनोद वाळके, प्रमोद भोसले, अमित गमरे, राम रजक, संजय सूर्यवंशी, प्रल्हाद ठाकूर आणि अक्षय तापकीर यांनी विशेष मेहनत घेतली.

नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही अशाच प्रकारचे शिबिर, स्पर्धा व विविध क्रीडा उपक्रम सातत्याने आयोजित करण्यात येणार असून, नव्या पिढीला सक्षम, सुदृढ आणि क्रीडामय बनविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन योगदान द्यावे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महापालिकेने अधिकृत नळजोड शुल्क केले जाहीर

## दोराबजी पॅराडाईज परिसरातील नवीन टाक्यांमधून पाणी पुरवठा सुरू; लायसेन्स प्लंबरांच्या अवाजवी मागणीनंतर पालिकेचे स्पष्टीकरण.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून महंमदवाडीमधील दोराबजी पॅराडाईज येथील तीन पाण्याच्या टाक्या सुरू केल्या आहेत. त्यानंतर आता महापालिकेकडून या ठिकाणी सोसायट्या तसेच खासगी मिळकतींना नळजोड देण्यात येत आहेत. त्यासाठी महापालिकेच्या मान्यताप्राप्त प्लंबरकडून पालिकेने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क मागितले जात असल्यास महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

या नळजोडांसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये मागण्यात येत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे, महापालिकेने या प्रकरणी खुलासा करीत नागरिकांनी पालिकेने निश्चित केलेले शुल्कच देण्याचे आवाहन सोसायट्यांना केले आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नवीन नळजोड मंजुरीसाठी लायसेन्स प्लंबरमार्फत प्रस्ताव सादर केल्यानंतर पाणीपुरवठा विभागाकडून जागा पाहणी करून मंजुरी दिली जाते.



### नळजोडासाठी निश्चित दर जाहीर

» महापालिकेने सन २०२६-२७ साठी घरगुती नळजोडांचे अधिकृत दर जाहीर केले आहेत. त्यानुसार अर्धा इंच नळजोडासाठी १ हजार ४७५ रुपये, पाऊण इंचासाठी २ हजार ९४६ रुपये, एक इंचासाठी ७ हजार ७५७ रुपये, तर दीड ते दोन इंच नळजोडासाठी १९ हजार ३९४ रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. बिगर घरगुती नळजोडांसाठी स्वतंत्र दर लागू आहेत. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा जादा शुल्क आकारले जात असल्यास नागरिकांनी कार्यकारी अभियंता, लष्कर पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नळजोडासाठी आकार आणि व्यासानुसार अधिकृत शुल्क आकारले जाते. पाण्याच्या मुख्य लाईनपासून मीटरपर्यंतचे काम महापालिकेकडून केले जाते, तर मीटरनंतरचे अंतर्गत प्लंबिंगचे काम संबंधित लायसेन्स प्लंबरमार्फत केले जाते. नवीन टाक्यांच्या माध्यमातून १२०० ते १५०० सोसायट्यांना नळजोड दिले जाणार आहेत.

तर यापूर्वी नळजोड असलेल्या सोसायट्यांना नव्याने नळजोड घेण्याची आवश्यकता नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. लायसेन्स प्लंबरांकडून कोणत्याही प्रकारची अवाजवी मागणी किंवा गैरप्रकार होत असल्यास नागरिकांनी कार्यकारी अभियंता, लष्कर पाणीपुरवठा विभागाकडे तत्काळ लेखी तक्रार करावी, असे महापालिकेने म्हटले आहे.

पाणीपुरवठा विभागाकडून जागा पाहणी करून नळजोड मंजुरी दिली जाते. सन २०२६-२७ साठी घरगुती अर्धा इंच नळजोडासाठी १ हजार ४७५ रुपये, पाऊण इंचासाठी २ हजार ९४६ रुपये, एक इंचासाठी ७ हजार ७५७ रुपये, तर दीड ते दोन इंच नळजोडासाठी १९ हजार ३९४ रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. बिगर घरगुती नळजोडासाठी वेगवेगळे दर लागू आहेत.

### अधिकृत शुल्कच भरा

» महंमदवाडीतील दोराबजी पॅराडाईज येथे महापालिकेकडून नव्या पाण्याच्या टाक्या सुरू करण्यात आल्या असून, आता परिसरातील सोसायट्या आणि खासगी मिळकतींना नवीन नळजोड दिले जात आहेत. काही मान्यताप्राप्त प्लंबरांकडून नळजोडासाठी अवाजवी शुल्क मागितले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्याने महापालिकेने नागरिकांना अधिकृत शुल्कच भरण्याचे आवाहन केले आहे. नळजोडासाठी आकार आणि व्यासानुसार निश्चित दर लागू असून, कोणतीही अतिरिक्त मागणी केल्यास नागरिकांनी तत्काळ पाणीपुरवठा विभागाकडे लेखी तक्रार करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### १५०० सोसायट्यांना पाणीपुरवठ्याचा लाभ

» महापालिकेकडून सुरू करण्यात आलेल्या नव्या पाण्याच्या टाक्यांमुळे महंमदवाडी परिसरातील सुमारे १२०० ते १५०० सोसायट्यांना नियमित पाणीपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे. पाणीपुरवठा विभागाकडून जागा पाहणी करून अधिकृत मंजुरीनंतरच नळजोड दिले जात आहेत. मुख्य जलवाहिनीपासून मीटरपर्यंतचे काम महापालिकेकडून केले जात असून, मीटरनंतरचे अंतर्गत प्लंबिंग संबंधित लायसेन्स प्लंबरमार्फत करण्यात येत आहे. यामुळे परिसरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम होणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

# कात्रज-कोंढवा रस्तारुंदीकरणाला वेग; 48 मिळकतींचा ताबा घेत उड्डाणपुलाचे काम सुरु

## भूसंपादनामुळे रखडलेला प्रकल्प मार्गी; दक्षिण पुण्यातील वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सुरू असलेल्या भूसंपादनाची प्रक्रिया आता वेगाने सुरू आहे. महापालिकेने गेल्या दोन दिवसांत 48 मिळकतींचा ताबा घेत महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. यामुळे कात्रज चौकातील उड्डाणपूल उभारण्याच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या उड्डाणपुलाच्या कामाचा मार्ग आता मोकळा झाला आहे

कात्रज-कोंढवा रस्तारुंदीकरण आणि भूसंपादन प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी महापौर मंजूषा नागपुरे आणि महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी अधिकाऱ्यांसोबत नुकतीच या कामाची पाहणी केली. आमदार योगेश टिळेकर, सभागृहनेते गणेश बिडकर, अतिरिक्त आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे, प्रभाग समिती अध्यक्षा रंजना टिळेकर, नगरसेविका पूजा कदम, अर्चना जगताप, पथ विभाग अधीक्षक अभियंता अजित बांबळे, विशेष भूसंपादन अधिकारी श्वेता धारुणकर, उपअभियंता दिगंबर बांगर आदी या वेळी उपस्थित होते.



भूसंपादन निवाडा प्रक्रियेअंतर्गत राजकिरण सोसायटीची जागा 15 मे रोजी अधिकृतरीत्या ताब्यात घेऊन ती पथ विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली. त्यानंतर लगेचच पथ विभागाने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. या टप्प्यामुळे कात्रज चौकातील उड्डाणपूल उभारण्याचे रखडलेले काम वेगाने पूर्ण होणार आहे.

कात्रज-कोंढवा रस्तारुंदीकरणासाठी एकूण 109 मिळकतींचे भूसंपादन आवश्यक असून, गेल्या दोन दिवसांत 48 मिळकती ताब्यात घेण्यात आल्या आहेत. यामध्ये सुमारे 25 हजार चौरस मीटर क्षेत्रफळाचा समावेश आहे. प्रशासनाकडून वेगाने सुरू असलेल्या कार्यवाहीमुळे रुंदीकरणाला गती मिळाली आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणाकडे नागरिकांचे विशेष लक्ष लागले असून, आता भूसंपादन प्रक्रियेला वेग आल्याने प्रत्यक्ष कामांनाही गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> "कात्रज-कोंढवा रस्तारुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया वेगाने सुरू आहे. उर्वरित जागाही लवकरच महापालिकेच्या ताब्यात घेऊन हा रस्ता गुणवत्तापूर्ण आणि वेगाने पूर्ण करण्यात येईल."
>
> - मंजूषा नागपुरे, महापौर.

# पुणे जिल्ह्याच्या विकासाला गती; जिल्हा वार्षिक योजनेसाठी 1472 कोटींची तरतूद

## महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून सर्वांगीण विकासावर भर – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती देण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत १४७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून गतवर्षीच्या तुलनेत ९३ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. पायाभूत सुविधा, पर्यटन, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासाला चालना देणाऱ्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना यंदाच्या नियोजनात विशेष प्राधान्य देण्यात आले असून विकासकामे गुणवत्तापूर्ण व निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्ह्याच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.




यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार व आमदार सहभागी झाले होते. प्रत्यक्ष उपस्थितीत खासदार मेधा कुलकर्णी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर पुणे जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीची बैठक ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली. या बैठकीत सन २०२५-२६ मधील निधी खर्चाचा आढावा घेण्यात आला तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीच्या नियोजनाला मंजुरी देण्यात आली. जिल्ह्याच्या वाढत्या विकास गरजा लक्षात घेऊन निधी वाढ, महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची अंमलबजावणी आणि विकासकामांच्या गुणवत्तेवर विशेष भर देण्यात येत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

### विकासासाठी विक्रमी निधी

**» पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत १४७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गतवर्षीपेक्षा ९३ कोटी रुपयांची वाढ करण्यात आल्याने पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पर्यटन आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील महत्त्वाच्या प्रकल्पांना गती मिळणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विकासकामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्याच्या वाढत्या गरजांचा विचार करून निधी वाढविण्यात आल्याने नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.**

### पर्यटन आणि वारसा संवर्धनाला चालना

**» यंदाच्या नियोजनात पुणे ग्रँड टूर, भिमाशंकर विकास आराखडा, संत तुकाराम महाराज जन्मस्थान विकास आराखडा आणि सिंहगड किल्ला समग्र विकास आराखडा यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांसाठी मोठा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. या प्रकल्पांमुळे धार्मिक पर्यटन, ऐतिहासिक वारसा संवर्धन आणि ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मागील वर्षातील १०० टक्के निधी खर्च करण्यात प्रशासनाला यश आल्याची माहिती दिली. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल नियोजन आणि गुणवत्तापूर्ण कामांवर प्रशासनाचा विशेष भर राहणार आहे.**

### पाणी, सुरक्षा आणि सुविधा यावर भर

**» जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शाळांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंती उभारणे, पाणीटंचाईग्रस्त भागांसाठी नियोजन करणे आणि यात्रा स्थळांवरील सोयीसुविधा वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. 'अल निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाला पाणी व्यवस्थापनासाठी पूर्वतयारी करण्यास सांगण्यात आले. पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच फ्लॅश फ्लडसारख्या घटनांवर नियंत्रणासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला.**

# एचएसआरपीसाठी पुन्हा एकदा मुदतवाढ; 'या' तारखेनंतर भरावा लागेल मोठा दंड

## पुण्यात 25 लाख वाहनांपैकी केवळ 9 लाख गाड्यांना बसली हाय सिक्युरिटी प्लेट; निम्म्याहून अधिक वाहनचालक अजूनही प्रतीक्षेत

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य परिवहन विभागाने २०१९ पूर्वीच्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्यास पुन्हा दीड महिन्याची म्हणजेच दि. ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे वाहनचालकांना दिलासा मिळाला असून, १ जुलैपासून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असल्याचे राज्य परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.



राज्यात २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंधनकारक आहे. मात्र, पुणे शहरासह राज्यातील बहुतांश जिल्ह्यात या एचएसआरपी बसवून घेण्यात काही वाहनचालकांमध्ये उदासीनता दिसून आली. परिणामी निम्म्याहून अधिक वाहनांना अद्याप एचएसआरपी नंबर बसलेली नाही.

त्यानुसार राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यास ३० जूनपर्यंत मुदत दिल्याचे सांगितले. दरम्यान, पुणे शहरात २५ लाखांपेक्षा जास्त वाहनांना ही नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. मागील दीड वर्षात अनेकवेळा नंबर प्लेट बसविण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली, तरीही आतापर्यंत केवळ ११ लाख ३४ हजार ६८४ वाहन मालकांनी एचएसआरपीसाठी नोंदणी केली आहे.

त्यातील ११ लाख ३२ हजार १०८ जणांना नंबरप्लेट बसविण्यास वेळ दिली असून, त्यातील ९ लाख ३० हजार २६९ वाहनमालकांनी नंबरप्लेट बसवून घेतली आहे. आजही ६३ टक्के वाहनमालकांनी नोंदणी केलेली नाही. त्यामुळे पुढील दीड महिन्यात नोंदणी न केलेल्या जवळपास १६ लाख वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### एचएसआरपी नंबर प्लेट अनिवार्य

**» राज्यात २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी परिवहन विभागाने ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या निर्णयामुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला असून, १ जुलैपासून एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. पुणे शहरात २५ लाखांहून अधिक वाहनांना ही नंबर प्लेट बसविणे आवश्यक असून आतापर्यंत सुमारे ११ लाख वाहनधारकांनी नोंदणी केली आहे. वाहनांची सुरक्षा वाढविणे, चोरी रोखणे आणि डिजिटल ओळख प्रणाली अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.**